पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड,सिव्हील लाईन,वाशिम, ता जि वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२–२३४८३४
ई–मेल sp.washim@mahapolice.gov.in
Website:-www.washimpolice.gov.in
प्रेस नोट

दिनांक :– ०३/११/२०२१

**मा. पोलीस अधिक्षक श्री. बच्चन सिंह यांनी दिपावलीच्या पुर्व संध्येला वाशिम पोलीस दलातील तब्बल २५० पोलीस अंमलदार यांना पदोन्नती दिली.**

मागील दोन वर्षापासुन वाशिम जिल्हा पोलीस दलातील पोलीस अंमलदार हे पदोन्नती पासुन वंचित राहिले होते. मा. पोलीस अधिक्षक श्री. बच्चन सिंह यांच्या हि बाब लक्षात येताच त्यांनी तात्काळ प्रभारी पोलीस उप अधिक्षक गृह श्री सोमनाथ जाधव तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी श्री यशवंत केडगे यांना संबधित मंत्रालयीन कर्मचारी यांचेकडुन माहिती घेऊन कारवाई करण्याबाबत आदेशित केले.

त्या अनुषंगाने प्रभारी पोलीस उपअधिक्षक गृह यांनी संबधित मंत्रालयीन कर्मचारी यांचेकडुन पात्र/अपात्र अंमलदार यांची यादी तयार करुन दिनांक ०२/११/२०२१ रोजी वाशिम जिल्हयातील ४७ पोलीस हवालदार यांची सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक, ८९ पोलीस नाईक यांची पोलीस हवालदार व ११४ पोलीस शिपाई यांची पोलीस नाईक या पदावर पदोन्नती करण्यात आली. त्यामुळे मागील दोन वर्षापासुन पदोन्नतीच्या प्रतिक्षेत असलेल्या पोलीस अंमलदार यांना दिवाळी सणाचे दिवशी पदोन्नती मिळाल्याने वाशिम जिल्हा पोलीस दलात सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे.

मा. पोलीस अधिक्षक श्री. बच्चन सिंह यांनी आज दिनांक ०३/११/२०२१ रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातुन सर्व पोलीस ठाणे तसेच शाखा येथील पोलीस अंमलदार यांचेशी संपर्क साधुन जे अंमलदार पदोन्नती पासुन वंचित आहेत त्यांच्या अडीअडचणी जाणुन घेण्याचा प्रयत्न केला व त्यांच्या पदोन्नती संदर्भातील अडचणीचे निवारण करण्याबाबत आश्वासन दिले. मा. पोलीस अधिक्षक श्री बच्चन सिंह यांचे हस्ते पदोन्नती मिळालेल्या अंमलदार यांना फित लावण्यात आल्या तसेच पोलीस अधिक्षक यांनी सर्व पोलीस अंमलदार हे चांगल्या प्रकारे काम करुन वाशिम पोलीस दलाचे नाव लौकीक करतील अशी आशा व्यक्त केली.

पोलीस निरिक्षक
स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम

Scanned with CamScanner